"विकसित महाराष्ट्र @ 2047" या संकल्पचित्रास पाठबळ देण्यासाठी राज्याच्या स्वतःच्या कर व करेतर महसुलात शाश्वत वाढ करण्याकरिता आणि राज्याची वित्तीय स्थिती सुदृढ करण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी "महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समिती" (Maharashtra Committee on Sustainable Public Finance) गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः-मआस-२०२६/प्र.क्र.४५/कराधान-१

५वा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांकः- १६ सप्टेंबर, २०२६.

वाचा :-

१. सोळाव्या वित्त आयोगाचा सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पुरस्कार कालावधीकरिताचा अहवाल व त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन.

२. महाराष्ट्र वित्तीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ६ अन्वये सन २०२६-२७च्या अर्थसंकल्पासोबत राज्य विधिमंडळासमोर ठेवण्यात आलेले महराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्युहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे-२०२६-२७ मध्यमकालीन वित्तीय धोरण विवरणपत्र व वित्तीय धोरण व्यूहरचना विवरणपत्र.

३. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिताचा महाराष्ट्र शासनाच्या राज्य वित्तव्यवस्थेसंबंधीचा अहवाल.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाने सर्वसमावेशक सामाजिक विकासावर विशेष भर देऊन गुंतवणूक-आधारित वाढीचे धोरण सक्रियपणे राबविले असून, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी मंत्रिमंडळाने मान्यता दिलेले "विकसित महाराष्ट्र @ २०४७" हे संकल्पचित्र स्वीकारले आहे. या संकल्पचित्रात सन २०३०, सन २०३५ आणि भारताच्या स्वातंत्र्याचे शताब्दी वर्ष असे टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. राज्य सन २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर आणि सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना, वाढीचा शाश्वत आणि विशेषतः युवकांसह सर्व संबंधित घटकांचा विचार करणारा, विकासाभिमुख व वित्तीयदृष्ट्या जबाबदार असा शासकीय वित्तव्यवस्थेचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

२. हे संकल्पचित्र प्रत्यक्षात आणण्यासाठी पायाभूत सुविधा, मनुष्यबळ विकास, जलसुरक्षा, नागरी व्यवस्था आणि ऊर्जा संक्रमण या क्षेत्रांमध्ये सार्वजनिक गुंतवणुकीत सातत्यपूर्ण वाढ करणे आवश्यक आहे. ही वाढ वेतन, निवृत्तिवेतन, व्याज व सामाजिक कल्याण यावरील राज्याच्या वाढत्या वचनबद्ध खर्चाच्या पलीकडे जाऊन करावी लागेल. राज्याने महाराष्ट्र वित्तीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये विहित केलेल्या उद्दिष्टांचे सातत्याने पालन केले असून यापुढेही तसेच करण्याचा शासनाचा मानस आहे. या वित्तीय शिस्तीच्या चौकटीत विकासासाठी उपलब्ध होणारी वित्तीय सामर्थ्य-मर्यादा (fiscal space) ही प्रामुख्याने राज्याच्या स्वतःच्या महसूल-प्रयत्नांच्या सामर्थ्यावर आणि खर्चाचे वाटप व त्याची अंमलबजावणी ज्या कार्यक्षमतेने केली जाते त्यावर अवलंबून असते.

३. तूट भरून काढण्यासाठी, गुंतवणूक प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यासाठी तसेच तात्पुरत्या वित्तीय अडचणी दूर करण्यासाठी कर्जाऊ निधीचा वापर करता येतो. तथापि, आवर्ती खर्च व आवर्ती महसूल यांच्यातील संरचनात्मक तफावत भरून काढण्यासाठी कर्जाऊ निधीचा वापर करणे विवेकपूर्ण अथवा इष्ट नाही. त्यामुळे संकल्पचित्र पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी संसाधने ही कर व करेतर महसुलातील टिकाऊ सुधारणेच्या पायावरच उभारावी लागतील.

त्यानुसार, अर्थव्यवस्थेच्या वाढीची उद्दिष्टे व त्यास अनुरूप असणारी संसाधनांची गरज यांचा मेळ साधण्यासाठी शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :

१. करपालनात सुधारणा करून, गळती रोखून, दर, शुल्क व सवलती यांचे सुसूत्रीकरण करून, सार्वजनिक मालमत्ता व उपक्रम यांपासून मिळणारा परतावा वाढवून, महसुलाचे नवे व अल्प वापर झालेले स्रोत निश्चित करून आणि सार्वजनिक खर्चाची कार्यक्षमता वाढवून, राज्याच्या स्वतःच्या कर व करेतर महसुलात शाश्वत वाढ करण्याकरिता तसेच राज्याची वित्तीय स्थिती सुदृढ करण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी शासन याद्वारे "महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समिती" (Maharashtra Committee on Sustainable Public Finance) (यापुढे "समिती" असा उल्लेख) गठित करीत आहे.

२. **समितीची रचना :**

अ. क्र.	नाव व पदनाम	समितीतील पद
i.	**डॉ. विजय ल. केळकर** तेराव्या वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष; भारत सरकारचे माजी वित्त सचिव व केंद्रीय वित्त मंत्र्यांचे माजी सल्लागार; उपाध्यक्ष, पुणे इंटरनॅशनल सेंटर.	अध्यक्ष
ii.	**प्रा. कार्तिक मुरलीधरन** टाटा चान्सलर्स प्रोफेसर ऑफ इकॉनॉमिक्स, कॅलिफोर्निया विद्यापीठ, सॅन दिएगो; संस्थापक व वैज्ञानिक संचालक, सेंटर फॉर इफेक्टिव्ह गव्हर्नन्स ऑफ इंडियन स्टेट्स (CEGIS)	सदस्य

अ. क्र.	नाव व पदनाम	समितीतील पद
iii.	**डॉ. नितीन करीर, भा.प्र.से. (निवृत्त)** महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव तसेच माजी अपर मुख्य सचिव (वित्त)	सदस्य
iv.	**श्री. टी. रबी शंकर** भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी उप-गव्हर्नर; सोळाव्या वित्त आयोगाचे अर्धवेळ सदस्य.	सदस्य
v.	**डॉ. आशिमा गोयल** अभ्यागत प्राध्यापक, इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था; अध्यक्ष, द इंडियन इकॉनॉमेट्रिक सोसायटी.	सदस्य
vi.	**अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव** वित्तीय सुधारणा, वित्त विभाग.	सदस्य
vii.	**श्री. एस. षण्मुगराजन, भा.प्र.से.** सह आयुक्त, राज्य वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र.	निमंत्रक

३. अध्यक्षांना, शासनाच्या सहमतीने, जास्तीत जास्त दोन अतिरिक्त सदस्य सहयोजित करून घेता येतील.

४. **समितीची कार्यकक्षा**:- समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील-

(i) वस्तू व सेवा कर तसेच पेट्रोलियम पदार्थ व मद्य यांवरील मूल्यवर्धित कर यांसह कर महसुलाच्या विविध घटकांचा समावेश करून राज्याच्या कर महसुलाची उत्स्फूर्तता (buoyancy) व स्थैर्य यांचा अभ्यास करणे; आणि विविध कर-विषयक व प्रशासकीय विदातळांची (databases) परस्पर सांगड घालून तसेच विश्लेषण व जोखीम-आधारित अंमलबजावणीचा अवलंब करून कर संकलनात सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाययोजना सुचविणे; तसेच विशेषत्वाने, सार्वजनिक आरोग्य व अंमलबजावणी या बाबी विचारात घेऊन, मानवी सेवनाकरिता वापरण्यात येणाऱ्या मद्याच्या नियमन व करआकारणी धोरणात बदल करून त्यापासून मिळणारा महसूल वाढविण्याचे मार्ग सुचविणे.

(ii) करेतर महसुलाचे नवे व अल्प वापर झालेले स्रोत निश्चित करणे व त्यांच्या वाढीसाठी विशिष्ट सूचना करणे; यामध्ये इतर बाबींसह राज्य सार्वजनिक उपक्रमांकडून मिळणारा लाभांश व अन्य परतावा, प्रमुख व गौण खनिजांवरील स्वामित्वधन व मृत भाडे, सार्वजनिक-खाजगी भागीदारी आणि वापर आकार यांचा समावेश असेल; तसेच वापर आकार, स्वामित्वधन व शुल्क यांचा, ज्या सेवा व मालमत्तांशी ते संबंधित आहेत त्यांच्या खर्चाच्या तुलनेत नियतकालिक फेरआढावा घेण्याकरिता चौकट सुचविणे.

(iii) नियोजन विभाग व संकल्पचित्र व्यवस्थापन कक्ष यांच्याशी विचारविनिमय करून, "विकसित महाराष्ट्र @ २०४७" संकल्पचित्राच्या तिन्ही टप्प्यांकरिता आवश्यक असणाऱ्या एकूण संसाधनांचे मूल्यमापन करणे; सोळाव्या वित्त आयोगाच्या पुरस्कार कालावधीकरिता राज्यासाठी मध्यमकालीन महसूल व्यूहरचना

(Medium Term Revenue Strategy) तसेच संकल्पचित्रात नमूद केल्यानुसार दीर्घकालीन व्यूहरचना सुचविणे.

(iv) राज्याच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीतील वित्तीय रोखता व्यवस्थापनाचे (financial liquidity management) परीक्षण करणे व त्याची कार्यक्षमता वाढविण्याचे मार्ग सुचविणे; तसेच विशेषतः पायाभूत सुविधा व सामाजिक क्षेत्रांमध्ये निष्पत्ती-आधारित अर्थसंकल्पाच्या (outcome budgeting) माध्यमातून शासकीय खर्चाचे वाटप व त्याची गुणवत्ता सुधारण्याबाबत सल्ला देणे.

(v) राज्याच्या अर्थसंकल्प व लेख्यांमधील शासकीय महसुलाचे वर्गीकरण, व्याख्या व सादरीकरण यांचे परीक्षण करणे आणि राज्याच्या सार्वजनिक वित्तव्यवस्थेच्या मांडणीत स्पष्टता येण्याच्या दृष्टीने शासकीय वित्तीय सांख्यिकी नियमावली, २०१४ (Government Finance Statistics Manual, २०१४) यांसह आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त मानकांचा अवलंब करण्याबाबत विचार करणे; तसेच उच्च व सर्वसमावेशक वाढीचा शाश्वत मार्ग सुनिश्चित करणाऱ्या, महाराष्ट्राकरिता वित्तीय उत्तरदायित्व विधिविधानाच्या योग्य चौकटीचा फेरआढावा घेऊन ती सुचविणे.

(vi) कार्यक्षमता व पारदर्शकता वाढविणाऱ्या संघटनात्मक व संस्थात्मक सुधारणा सुचविणे; यामध्ये महसुलाचे अंदाज वर्तविणे, कर-सवलत विश्लेषण (tax expenditure analysis) व महसूल संशोधन यांकरिता वित्त विभागात कायमस्वरूपी क्षमता निर्माण करण्याचा समावेश असेल; नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विकास प्राधिकरणे यांचे स्वतःचे उत्पन्न - मालमत्ता कर, विकास शुल्क व भूमूल्य संकलन (land value capture) यांसह - ज्या मर्यादेपर्यंत राज्याच्या वित्तीय हस्तांतरणावर व संभाव्य दायित्वांवर परिणाम करते त्या मर्यादेपर्यंत त्याचे परीक्षण करणे; तसेच वरील बाबींशी संबंधित अथवा त्यास पूरक अशी अन्य कोणतीही बाब किंवा शासनाकडून समितीकडे सोपविण्यात आलेली अन्य कोणतीही बाब विचारात घेणे.

५. कार्यपद्धती व प्रक्रिया:-

(i) **बैठका व विचारविनिमय:** समितीच्या बैठका अध्यक्षांच्या निर्देशानुसार होतील व त्या प्रत्यक्ष अथवा दूरदृश्य प्रणालीद्वारे घेता येतील. समितीस मुंबई, पुणे, नागपूर अथवा अन्यत्र विचारविनिमय बैठका घेता येतील आणि व्यापार व उद्योग संघटना, व्यावसायिक संस्था, करदाते, शैक्षणिक संस्था व सर्वसामान्य नागरिक यांच्याशी सल्लामसलत करता येईल. कार्यक्रमपत्रिकेवरील विशिष्ट विषयांकरिता समितीस विभाग प्रमुख, क्षेत्रीय अधिकारी अथवा विषय तज्ज्ञ यांना कायमस्वरूपी सदस्य न करता सहयोजित करता येईल अथवा विशेष निमंत्रित म्हणून बोलावता येईल.

(ii) **माहिती मागविण्याचे अधिकार:** राज्यातील कोणताही विभाग, सार्वजनिक उपक्रम, मंडळ, प्राधिकरण, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा महसूल संकलन करणारी यंत्रणा यांच्याकडून कोणतेही अभिलेख, विवरणपत्रे, विदा अथवा अहवाल मागविण्याचा आणि अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती सादर करण्यास सांगण्याचा अधिकार समितीस राहील. संबंधित विभाग व यंत्रणा समितीने विहित केलेल्या मुदतीत त्याची पूर्तता करतील आणि करदात्यांच्या माहितीच्या गोपनीयतेसंबंधीच्या लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींच्या अधीन राहून, समितीच्या विश्लेषणासाठी आवश्यक असणारी नाव-वगळित (anonymised) घटक-स्तरीय व व्यवहार-स्तरीय विदा मागणीनुसार उपलब्ध करून देतील. समितीचे सदस्य, समितीच्या कार्यालयीन

यंत्रणेतील कर्मचारी व समितीच्या कामकाजाशी संबंधित सर्व व्यक्ती अशा माहितीची गोपनीयता राखतील व तिचा वापर केवळ समितीच्या प्रयोजनासाठीच करतील.

(iii) **उपगट:** समितीस स्वतंत्र महसूल शीर्षांकरिता अथवा विषयांकरिता निश्चित कार्यकक्षा व कालमर्यादेसह उपगट अथवा कार्यगट स्थापन करता येतील; यामध्ये वस्तू व सेवा कर आणि मूल्यवर्धित कर; नोंदणी व मुद्रांक; राज्य उत्पादन शुल्क; मोटार वाहन कर; ऊर्जा व वीज शुल्क; खाणी व खनिजे; करेतर महसूल, सार्वजनिक उपक्रमांचा लाभांश व मालमत्ता चलनीकरण; तसेच खर्चाची कार्यक्षमता व वित्तीय अहवाल सादरीकरण यांसाठीच्या उपगटांचा समावेश असू शकेल.

(iv) **कार्यालयीन यंत्रणा (सचिवालय):** पुणे इंटरनॅशनल सेंटर, पुणे ही संस्था समितीसाठी कार्यालयीन यंत्रणा उपलब्ध करून देईल आणि समितीच्या बैठका आयोजित करणे, अभिलेख जतन करणे, विभाग व यंत्रणा यांच्याशी समन्वय साधणे, पार्श्वभूमी-विषयक साहित्य तयार करून घेणे व संकलित करणे तसेच समितीच्या अहवालांचे मसुदे तयार करणे ही कामे पार पाडील. सेंटर फॉर इफेक्टिव्ह गव्हर्नन्स ऑफ इंडियन स्टेट्स (CEGIS) ही संस्था, महसूल संकलन करणाऱ्या विभागांकडील प्रशासकीय विदेचे संकलन व विश्लेषण यांसह, विश्लेषणात्मक, विदा-विषयक व संशोधनात्मक सहाय्य पुरवून कार्यालयीन यंत्रणेस मदत करील. वित्त विभाग हा समितीचा प्रशासकीय विभाग राहील आणि सहाय्याची व्याप्ती, विदेची अभिरक्षा, सुरक्षा व विल्हेवाट यांसंबंधीची व्यवस्था तसेच नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची गोपनीयतेविषयक जबाबदारी नमूद करणारा सामंजस्य करार प्रत्येक संस्थेशी करील.

(v) **अहवाल व कालावधी:** समिती वित्त विभागामार्फत शासनास अहवाल सादर करील आणि विशिष्ट, प्राधान्यक्रमानुसार मांडलेल्या व कालबद्ध शिफारशींसह आपला अहवाल या शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या सहा महिन्यांत सादर करील; समितीस कोणत्याही वेळी अंतरिम अहवाल सादर करता येईल. अहवालात प्रत्येक शिफारशीसंदर्भात संबंधित विभाग, ती अंमलात आणण्यासाठी आवश्यक असणारे साधन, तिचा अंदाजित वित्तीय परिणाम व अंमलबजावणीची कालमर्यादा नमूद करण्यात येईल. समितीच्या शिफारशींवर विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा पाठपुरावा वित्त विभाग करील. समितीस, आवश्यक वाटल्यास, आपल्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या वार्षिक मूल्यमापनाची कार्यपद्धती सुचविता येईल.

६. पीआयसीने (PIC) सादर केलेल्या सचिवालयाच्या सेवांचा खर्च (Secretariat Services), अध्यक्ष व अशासकीय सदस्यांचे मानधन, मुक्काम व प्रवास खर्च, तसेच बैठका आणि परिषदांचे नियोजनांचा खर्चाच्या प्रस्तावाला याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. सदर प्रस्तावामध्ये खालील बाबींचा समावेश आहे-

अ.क्र.	**विवरण**	**खर्च**
i.	३ सल्लागार (शुल्क, प्रवास आणि मुक्काम खर्च)	२२,०५,०००/-
ii.	सचिवालय प्रमुख आणि संशोधन साहाय्य.	१५,००,०००/-
iii.	पीआयसी (PIC) सहाय्य सेवा खर्च (तंत्रज्ञान, स्टेशनरी, आयटी सुरक्षा, संकीर्ण आणि प्रशासकीय खर्च)	१५,६९,०००/-
iv.	भागधारकांच्या (Stakeholders) गोलमेज बैठका	३,००,०००/-
v.	समितीचे अध्यक्ष आणि अशासकीय सदस्य यांचे मानधन, मुक्काम आणि प्रवास खर्च.	१३,६०,०००/-
	एकूण खर्च	**६९,३४,०००/-**

- वरील खर्चाचा तपशील रुपये ६९,३४,०००/- हा सर्व कर वगळून आहे.

७. वरील नमूद खर्च, सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता '**मागणी क्र.**जी-४, **मुख्य लेखाशीर्ष**-२०५२-सचिवालय सर्वसाधारण सेवा,०९०-सचिवालय (००)(०१) वित्त विभाग (अनिवार्य) (२०५२०२३२), २८-व्यावसायीक सेवा'या उदिष्टाखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-५५९/२०२६/व्यय-७, दिनांक १६.९.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने तसेच मा. मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९१६१६१३११७९०५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विकास चंद्र रस्तोगी)
शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रति-

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
६. महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य.
७. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) तसेच महालेखापाल (लेखापरीक्षा) १ व २, महाराष्ट्र, मुंबई व नागपूर.
९. संचालक, पुणे इंटरनॅशनल सेंटर, पुणे.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, सेंटर फॉर इफेक्टिव्ह गव्हर्नन्स ऑफ इंडियन स्टेट्स (CEGIS).

प्रत-

१. उप सचिव / अवर सचिव, वित्त विभाग (अर्थसंकल्प / व्यय / सुधारणा / ऋण व्यवस्थापन), मंत्रालय, मुंबई.
२. वेतन व लेखा अधिकारी, मुंबई; निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई; संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. निवडनस्ती, कराधान-१, वित्त विभाग.

Constitution of the "Maharashtra Committee on Sustainable Public Finance" to recommend measures for the sustainable augmentation of the State's own tax and non-tax revenues and for the consolidation of its fiscal position to support the "Viksit Maharashtra @ 2047" Vision.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

FINANCE DEPARTMENT

Government Resolution No.: RAC-2026 /C.R.45/Taxation-1

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai – 400 032.

Date: 16th September, 2026.

Read:

1. Report of the Sixteenth Finance Commission for the award period 2026-27 to 2030-31, and the Explanatory Memorandum thereon.
2. Medium Term Fiscal Policy, Fiscal Policy Strategy Statement and Disclosures for Maharashtra State laid before the State Legislature with the Budget for 2026-27 under rule6 of the Maharashtra Fiscal Responsibility and Budgetary Management Act, 2005.
3. Report of the Comptroller and Auditor General of India on State Finances, Government of Maharashtra, for the year ended 31st March, 2025.

Background:

The Government of Maharashtra has actively pursued investment-led growth with a specific focus on inclusive social development, and has adopted the "Viksit Maharashtra @ 2047" Vision approved by the Council of Ministers on 28th October, 2025, with milestones for the years 2030, for 2035 and for the centenary year of India's independence. As the State works towards its goal of becoming a 1trillion-dollar economy by 2030 and a 5 trillion-dollar economy by 2047, it is necessary to create a growth-oriented and fiscally responsible roadmap for government finances that sustains growth opportunities and caters to all stakeholders, especially the youth.

2. The delivery of this Vision requires a sustained increase in public investment in infrastructure, human capital, water security, urban systems and the energy transition, over and above the State's growing commitments on salaries, pensions, interest and social welfare. The State has consistently observed the targets prescribed under the Maharashtra Fiscal Responsibility and Budgetary Management Act, 2005 and intends to continue to do so. Within that discipline, the fiscal space available for development is determined principally by the strength of the State's own revenue effort and by the efficiency with which its expenditure is allocated and executed.

3. Borrowed funds can be used to bridge deficits, and to finance investment projects and relieve temporary financing constraints. But using borrowed funds to bridge a structural gap between recurring expenses and recurring revenues is neither prudent nor advisable. Hence the resources required to fulfil the vision must be raised on a foundation of durable improvement in tax and non-tax revenues.

Accordingly, to align the growth objectives of the economy with commensurate growth in resources requirement, the Government is pleased to issue the following resolution.

GOVERNMENT RESOLUTION:

1. Government hereby constitutes a Committee to be called the "Maharashtra Committee on Sustainable Public Finance" (hereinafter "the Committee") to recommend measures for the sustainable augmentation of the State's own tax and non-tax revenues and for the consolidation of its fiscal position, by improving compliance, plugging leakages, rationalising rates, fees and exemptions, strengthening returns from public assets and enterprises, identifying new and under-tapped sources of revenue, and improving the efficiency of public expenditure.

2. Composition.

Sr. No.	Name and Designation	Position
1.	**Dr. Vijay L. Kelkar** Former Chairman, Thirteenth Finance Commission; former Finance Secretary and former Adviser to the Union Finance Minister; Vice President, Pune International Centre.	Chairperson
2.	**Prof. Karthik Muralidharan** Tata Chancellor's Professor of Economics, University of California San Diego; Founder and Scientific Director, Centre for Effective Governance of Indian States (CEGIS)	Member
3.	**Dr. Nitin Kareer, I.A.S. (Retd.)** Former Chief Secretary and former Additional Chief Secretary (Finance), Government of Maharashtra.	Member
4.	**T. Rabi Sankar** Former Deputy Governor, RBI; part time member of the 16th Finance Commission.	Member
5.	**Dr. Ashima Goyal** Visiting Professor, Indira Gandhi Institute of Development Research; President of The Indian Econometric Society.	Member
6.	**Additional Chief Secretary /Principal Secretary/ Secretary** Financial Reforms, Finance Department.	Member
7.	**S. Shanmugrajan, IAS,** Joint Commissioner, SGSTD, Maharashtra.	Convenor

3. The Chairperson may, with the concurrence of Government, co-opt not more than two additional Members.

4. **Terms of Reference**:-

(i) To study the buoyancy and stability of the State's tax revenues including the various components of tax revenues covering among others GST and VAT on petroleum and liquor – and to recommend measures to improve tax collection through the linking of various tax and administrative databases and the use of analytics and risk-based enforcement; and, in particular, to recommend ways of enhancing revenue from alcohol for human consumption through changes in the regulation and taxation of potable alcohol, having regard to public health and enforcement considerations.

(ii) To identify new and under-tapped non-tax revenue sources and to make specific suggestions for their enhancement, including among others dividends and other returns from State public sector undertakings, royalties and dead rent from major and minor minerals, public-private partnerships and user charges; and to recommend a framework for the periodic review of user charges, royalties, and fees against the cost of the services and assets to which they relate.

(iii) To assess, in consultation with the Planning Department and the Vision Management Unit, the resource envelope implied by the Viksit Maharashtra @ 2047 Vision over its three milestones; to recommend a Medium Term Revenue Strategy for the State for the award period of the Sixteenth Finance Commission and a long term strategy as laid out in the Vision.

(iv) To examine financial liquidity management within the State's public financial management system and to suggest ways of improving its efficiency, and to advise on increasing the allocative and quality of government expenditure, including through outcome budgeting, particularly in the infrastructure and social sectors.

(v) To examine the classification, definition and presentation of government revenue in the State's budget and accounts and examine the adoption of internationally accepted standards, including those of the Government Finance Statistics Manual, 2014, so as to introduce clarity to the reporting of the state's public finances; and to review and suggest an appropriate framework for fiscal responsibility legislation for Maharashtra that ensures a sustainable trajectory of high and inclusive growth.

(vi) To suggest such organisational and institutional reforms as would improve efficiency and transparency, including a permanent capacity within the Finance Department for revenue forecasting, tax expenditure analysis and revenue research; to examine the own revenues of urban and rural local bodies and development authorities, including property tax, development charges and land value capture, to the extent that these bear upon the State's fiscal transfers and contingent liabilities; and to consider any other matter incidental or germane to the above or referred to the Committee by Government.

5. Process and Procedure.

(i) **Meetings and consultation.** The Committee shall meet at the direction of the Chairperson, and may meet in person or through video conference. It may hold consultations at Mumbai, Pune, Nagpur or elsewhere, and may consult trade and industry associations, professional bodies, taxpayers, academic institutions and the general public. It may co-opt, or invite as special invitees, Heads of Departments, field officers or subject experts for specific items on its agenda, without their becoming permanent Members.

(ii) **Power to call for information.** The Committee is empowered to call for any record, return, data or report from any Department, Public Sector Undertaking, Board, Authority, local

body or revenue-collecting agency of the State, and to require officers to furnish information in person. Departments and agencies shall comply within the time stipulated by the Committee, and shall on request provide anonymised unit-level and transaction-level data required for its analysis, subject to the applicable provisions of law relating to confidentiality of taxpayer information. Members of the Committee, the personnel of its Secretariat and all persons associated with its work shall maintain the confidentiality of such information and use it solely for the purposes of the Committee.

(iii) **Sub-groups.** The Committee may constitute sub-groups or working groups for individual revenue heads or subjects, with defined terms of reference and timelines – including for Goods and Services Tax and Value Added Tax; Registration and Stamps; State Excise; Motor Vehicles Tax; Energy and Electricity Duty; Mines and Minerals; non-tax revenue, public sector undertaking dividends and asset monetisation; and expenditure efficiency and fiscal reporting.

(iv) **Secretariat.** The Pune International Centre, Pune shall provide the Secretariat to the Committee, and shall convene its meetings, maintain its records, coordinate with Departments and agencies, commission and compile background material and prepare the drafts of its reports. The Centre for Effective Governance of Indian States (CEGIS) shall assist the Secretariat with analytical, data and research support, including the assembly and analysis of administrative data from the revenue-collecting departments. The Finance Department shall be the administrative Department for the Committee and shall enter into a memorandum of understanding with each institution setting out the scope of the support, the arrangements for the custody, security and disposal of data, and the confidentiality obligations of the personnel deployed.

(v) **Reporting and tenure.** The Committee shall report to Government in the Finance Department and shall submit its report, with specific, prioritised and time-bound recommendations, within a period of six months from the date of this Government Resolution; it may submit an interim report at any time. The report shall, for each recommendation, indicate the Department concerned, the instrument required to give it effect, the indicative fiscal implication and the timeline for implementation. The Finance Department shall track the action taken by Departments on the recommendations of the Committee. The committee may, if so desired, suggest the mechanism for an annual appraisal of the implementation of its recommendations.

6. Approval is hereby accorded to the proposal submitted by PIC towards the Costs of Secretariat Services and the Honorarium, Stay and Travel expenses of the Chairman and nonofficial members of the Committee, arrangements of meetings and conferences as below-

Sr. No.	Particulars	Expenses
i	3 Consultants (fee, travel and stay)	22,05,000/-
ii	Secretariat In-charge and Research Assistance	15,00,000/-
Iii	PIC Support service cost (Tech, Stationery, IT Security, Misc. & Admin)	15,69,000/-
iv	Stakeholder Roundtables	3,00,000/-
v	Honorarium, Stay and travel of Chairman and Non Official Members of the Committee.	13,60,000/-
	Total Cost Estimate	**69,34,000/-**

- Above Cost is exclusive of taxes.

7. The expenditure mentioned above shall be met from the sanctioned provision under '**Demand No.**-4, **Major Head**-2052- Secretariat General Services, 090-Secretariat (00) (01) Finance Department (Committed) (20250232), 28-Professional Services' for the financial year 2026-27.

8. This Government Resolution is issued with the concurrence of the Finance Department vide its informal reference No. 559/2026/Exp-7, dated 16.9.2026, and with the approval of the Hon'ble Chief Minister and Hon'ble Minister (Finance). It is available on the website of the Government of Maharashtra at www.maharashtra.gov.in under computer code 202609161613117905, and has been issued under digital signature.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Vikas Chandra Rastogi)
Additional Chief Secretary to Government.

To,

1. The Secretary to the Hon'ble Governor of Maharashtra.
2. The Additional Chief Secretary to the Hon'ble Chief Minister.
3. The Private Secretaries to the Hon'ble Deputy Chief Ministers and ministers, and the Hon'ble Minister of State (Finance).
4. Chief Executive Officer, Maharashtra Institution for Transformation (MITRA), Mumbai.
5. The Chief Secretary, Government of Maharashtra.
6. The Chairperson and all Members of the Maharashtra Committee on Sustainable Public Finance.
7. All Additional Chief Secretaries / Principal Secretaries / Secretaries to Government, Mantralaya, Mumbai.
8. The Accountant General (A&E) and (Audit)-I and II, Maharashtra, Mumbai and Nagpur.
9. The Director, Pune International Centre, Pune.
10. The Chief Executive Officer, Centre for Effective Governance of Indian States.

Copy to-

1. The Deputy Secretary / Under Secretary, Finance Department (Budget / Expenditure / Reforms / Debt Management), Mantralaya, Mumbai.
2. The Pay and Accounts Officer, Mumbai; the Resident Audit Officer, Mumbai; the Director of Accounts and Treasuries, Maharashtra State, Mumbai.
3. Select File, Taxation-1, Finance Department.